# प्रकरण चौथे

## व्यक्तिचित्रण ---

## प्रकरण चौथे

`व्यक्तिचित्रण हा ललित वाङ्मयाचाच एक महत्वाचा भाग आहे.`[१] कथानकापेक्षा व्यक्तिदर्शन हेच महत्वाचे हा विचार-ही जवळ जवळ सर्वमान्य आहे.
" The foundation on good fiction is character - - and nothing else " -- -- असे अर्नोल्ड बेनेटने एके ठिकाणी म्हटले आहे. हेन्री जेम्सने कथानक आणि व्यक्तिरेखा या दोहोंचा परस्पर संबंध स्पष्ट करताना `"Which in incident but the illsuotuation of characeter .... " असे म्हणून लघुकथेतील हे दोन्ही फरक एकमेकांवर कसे अवलंबून आहेत हे सांगितले आहे. तर प्रा.ना.सी.फडके यांनी कथा रचनेपेक्षा व्यक्तिदर्शन चातुर्य दसपटीनी अधिक महत्वाचे आहे`[२] असे प्रतिभासाधनमध्ये म्हटले आहे आणि त्याच प्रतिमा साधनामध्ये कथारचनेपेक्षा व्यक्तिदर्शन हेच ललित कथेचे अधिक महत्वाचे अंग आहे.`[3] असा उल्लेखही करतात.

जुन्या कथेतील व्यक्तिदर्शन हे ज्याप्रमाणे साधनभूत होते त्याचप्रमाणे ते मार्मिकही होते. माणसाच्या वर्तनातील वरवरची आणि पुष्कळशी जाणीवपूर्वक निर्माण केलेली जी संगती असते तिचे चित्रण करण्यालाच जुन्या कथाकारांनी महत्व दिले .माणसांच्या अंतर्विश्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा केवळ एकाच पातळीवरून त्यांच्या व्यक्तिमत्वाची ओळख चित्रित करण्यात त्यांनी धन्यता मानली,तर गंगाधर गाडगीळ ,अरविंद गोखले, पु.भा. भावे, व्यंकटेश माडगूळकर इत्यादी आधुनिक मराठी लघुकथाकारांनी माणसाचे अनेकपदरी व्यक्तिमत्व, त्यातील संगती-विसंगती व अंतर्विरोध या सर्वांचे उत्कटपणे चित्रण केले. मराठी लघुकथेतील व्यक्तिचित्रणाच्या या नव्या जाणिवामागे युरोपातील मोपांसा,चेखॉव,मॅन्सफिल्ड,हेमिंग्वे,ब्रेट्स सारोयान, इ.कथाकारांचा मोठा भाग होता त्यात शंका नाही.

` १९४०-४५ पर्यन्तची कथा ही कथानक प्रधान होती. १९४५ नंतरच्या नवकथेच्या प्रमुख शिल्पकारांनी मात्र लघुकथेतून व्यक्त होणाऱ्या अनुभवालाच महत्व दिले. मनोविश्लेषण हा त्यांच्या कथेचा एक अविभाज्य भाग आहे. त्यांनी माणसाच्या गुंतागुंतीच्या व्यक्तित्वाचे आपल्या कथांतून मराठी वाचकांना दर्शन घडविले.आणि मानवी व्यक्तित्वाच्या अज्ञानतेपणात बुडालेल्या भागाचे चित्रण करून त्याला एक नवे परिमाण व पूर्णत्व दिले असे तिच्या एका प्रमुख शिल्पकाराने म्हटले आहे.` [४]

नवकथेचे शिल्पकार ठरलेल्या गंगाधर गाडगीळ,गोखले,भावे, माडगूळकर यांनी आपल्या कथेतील व्यक्तींची चित्रणे ज्या पध्दतीने केली तशीच दि.बा. मोकाशींनी-ही केलेली आहेत. त्यामुळे त्यांच्या कथेतील व्यक्ती स्वत:चे एक वेगळे वैशिष्ट्य घेऊन आलेल्या आहेत.

त्यांच्या कथांत जी माणसे वावरतात ती तुमच्या आमच्यासारखी सुख शोधणारी, दु:ख भोगणारी असतात. ती परस्परांशी या ना त्या नात्यानी बांधलेली असतात. ती जीवनाला विटलेली नसतात, तर जीवनावर अपार प्रेम करतात.

त्यांच्या कथांनी त्यांच्या व्यक्तींच्या मनाचे पदर नाजुकपणे उलगडावेत असे त्याना वाटते. ` आता आमोद सुनासि आले ` ही चांगली कथा लिहिणाऱ्या दि.बा.मोकाशींच्या मनाचे आकलन अचूक झाले आहे. ` दैनंदिन जीवनातील परिचित घटनात दडलेली अद्भुतता ते आपल्या कथांद्वारे आपल्या तरल,फुलासारख्या हलक्या अंत:करणास भिडणाऱ्या शैलीने दाखवून देतात.` [५] त्यांच्या कथांतील ` आमोद सुनासि आले ` ही त्यांची गाजलेली कथा जन्म आणि मृत्यू यांचे गुढ शोधणारी, मृत्यूमुळे जाणारा व जन्मामुळे येणारा जीव हाती लागेल का ? याचा अनुभव घेणारी कथा आहे. ` [६]

मोकाशींच्या कथांतून साकार होणाऱ्या व्यक्तिरेखा या त्या त्या समाजमनाचं दर्शन जसं घडवून देतात त्याचप्रमाणे मानवी मनाचे पदर त्या त्या व्यक्तींच्या अनुषंगानी,परिस्थितीच्या माध्यमातून उकलून दाखविण्याचा प्रयत्न

करतात हे त्यांच्या कथेचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. विशेषत: मध्यमवर्गीय मानवी मनाचा चित्रपट ते वाचकांच्या डोळ्यासमोर उभा करतात. आणि त्यामुळे त्यांच्या कथेतील व्यक्ती स्वत:चे असे खास वैशिष्ट्य घेऊन कथेत आलेल्या आहेत. असे वाटते, त्यांच्या कथेत गरीब-श्रीमंत, निस्वार्थी-अभिलाषी, प्रेमळ-गर्विष्ट, निरागस-मग्रूर, सुष्ट-दुष्ट, कामसू-उडाणटप्पू, कर्तबगार-पेंताळू अशा सर्व गुणधर्मांच्या व्यक्ती आलेल्या आहेत.

पावसाच्या पुरातून आपला एकुलता मुलगा वाहून गेल्यामुळे दु:खी झालेला पण गावातील नेमाण्याची गाय अडल्याचे समजताच आपलं दु:ख बाजूला सारून त्या गायीची सुटका करण्यासाठी धावणारा रामजी लोहार आहे ( आता आमोद सुनासि आले ), तर दारिद्र्याने, अज्ञानाने व अंधश्रद्धेने पिडित झालेल्या लोकांना अनेक मार्गाने लुटणारा मग्रूर गणू साक्कार आहे ( रात्र संपली, दिवस उजाडला ।

नास्तिक वृत्तीचे पण कौटुंबिक कोंडमारा असह्य होऊन चिंतित झालेले प्रो.काळे आहेत ( नास्तिक ), तर एका गरीब घराण्यात जन्माला येऊनही स्वत:च्या कर्तबगारीमुळे जिद्दीने पुढे गेलेला पण भावाच्या बदफैली वर्तनाने अस्वस्थ होऊन मानसिक कोंडमारा असह्य झालेला राजा काळे आहे ( गावाकडे ).

गृहेतील चैतन्यमय लेणी पाहून प्रभावीत झालेल्या व त्याच्या शेजारचे सुस्त खेडे पाहून त्यातील विसंगती शोधण्यात अंतर्मुख झालेला नायक आहे(लेणी), तर आपली प्रेयसी आपल्याला कायमची सोडून आपल्या गावी जात असलेली पाहून खंती झालेला व तिचे आपल्यावर असलेले प्रेम न ओळखून तिच्या बेपर्वाईच्या उत्तराने अधिकच अस्वस्थ झालेला पण तिच्या ढोंगाची जाणीव होताच आनंदित झालेला नायक आहे ( निरोप ).

गरिबीमुळे व दारिद्र्यामुळे आयुष्याला कंटाळलेल्या व बेशुध्द पडलेल्या बालकाला वाचविण्याची व त्याचा सांभाळ करण्याची शपथ घेणारा नायक आहे ( किल्ला ), तर दुसऱ्याच्या वास्तूवर अभिलाषा ठेवून राहणारा अभिलाषी नायक आहे ( वास्तु ).

चैतन्यमय लेणी व सुस्त खेडे पाहून अंतर्मुख झालेल्या आपल्या प्रियकराला पाहून अस्वस्थ झालेली व मनातून काहीशी रागावलेली सुशी आहे ( लेणी ), तर केशववर असलेल्या प्रेमामुळे त्याच्या घरी जाऊन त्याच्या आईला मदत करणारी सिंधू आहे ( नकोरे आत येऊ केशव । ).

आपल्या ऐश्वर्याचा थोडासुध्दा गर्व न बाळगता गरीब नाना वर मनापासून प्रेम करणारी श्रीमंत मनाची ऊषा आहे. (लहानपण आणि मोठेपण ), तर आपल्या प्रियकरावरील नितांत प्रेमामुळे त्याला फोन करून आपल्याला निरोप देण्यास बोलविणारी पण आपल्या मनातील प्रेम त्याला बेपर्वाईची उत्तरे देऊन समजू न देणारी नायिका आहे ( निरोप ).

लग्नविधि व संसाराबद्दलच्या वेगळ्या कल्पना असलेले व लग्नानंतरची पहिली रात्र एकमेकांची ओळख करून घेण्यात, एकमेकांना समजावून घेण्यात व चांगल्या संसाराचे आडाखे आखण्यात घालविणारे 'शाम' व 'लता' आहेत (काय रानटी लोक आहेत ), तशीच पहिल्या भेटीतच एकमेकांवरील आंतरिक प्रेमामुळे एकमेकांना समजावून घेणारी व लग्नाची इच्छा प्रकट करणारी नायक व नायिका आहेत ( तिची भीती ).

आपल्या गुणांमुळे सर्वांना आपलसं करणारी व पतीच्या बदफैली वर्तनाने होणारा मानसिक कोंडमारा मुकाटयाने सहन करणारी सालस-सुगृहिणी 'गोदू' आहे ( तिचा नवरा ), तर सरंजामशाहीत होणारा कोंडमारा सहन न होऊन त्याला लाथाडून जाण्याचा प्रयत्न करणारी मामी आहे ( गोरी घारी मामी ).

वयाच्या अठ्ठेचाळीसाव्या वर्षी एका अठरा वर्षात पदार्पण करणाऱ्या कुमारी बरोबर विवाहबध्द होऊन तिला वारंवार प्रौढत्वाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करणारा 'मुरली' आहे ( मुरली ), तर आपल्या मुलीच्या लग्नासाठी वयाच्या सत्तरीतही नोकरी करून तिच्या हुंडयाची तजवीज करण्यासाठी धडपडणारा इंजिनिअर देणावकर आहे ( पाच हजार गायी ).

दारिद्र्यामुळे होणारी कौटुंबिक ओढाताण थांबविण्यासाठी व कर्जाचा

डोंगर हलका करून मुलांचे शिक्षण पूर्ण करण्यासाठी बँकेत चोरी करण्यास प्रवृत्त झालेले बारामतीकर आहेत ( सुटका ), तर घरात भांडण काढून आपल्या प्रेमळ पत्नीला कामाला लावून तिच्या मिळकतीच्या पैशावर मजा मारणारा नीच बंडू आहे ( तिचा नवरा ).

बेकारीने त्रस्त झाल्यामुळे उनाडक्या करत गावभर भटकणारा, उद्योग करण्यास नाखुषा असलेला मी आहे ( अकृत ), तर स्वतःला सतत कामामध्ये गुंतवून घेतलेला व साचेबंद जीवन जगणारा उद्योगी विनोद आहे (पाकिटचोर )

आपल्या नातीवर असलेल्या जीवापाड प्रेमामुळे तिच्या लग्नाची चालढकल करणारे आजोबा आहेत ( म्हाता-याचे शेवटचे दिवस ), तशीच आपल्या नातवाला व पणतवंडांना शहरात दूध,दही मिळत नसल्यामुळे दुःखी झालेली व त्यांच्यासाठी आपल्या वृध्दापकाळी म्हैस बाळगून त्याची डोळ्यात तेल घालून वाट पाहणारी आजी आहे ( आजीची म्हैस ),

परिस्थितीने लुळा-पांगळा बनलेल्या पण कर्तृत्व करण्याची मनिषा बाळगून बँकेतील दरोडा पकडून देणारा कर्तबगार नमू आहे (मायबाप ), तर अवचित आलेल्या वाघाने घरात असलेल्या आपल्या बायकोला नेल्याचे समजताच बोंबाबोंब करून चार भिंतीत स्वतःला कोंडून घेणारा भित्रा जाधव मिस्त्री आहे ( हाका ).

प्रेमाची पूर्ण जाणीव नसतानाही शारीरिक आकर्षणाला प्रेम समजून स्वतःला कोंडून घेणारी पण लग्न केल्यानंतर स्वतःच्या संसारात व मुलात हरवून जाणारी अल्लवयीन अल्लड रागिणी आहे ( माझ्यावर गोष्ट लिही ), तर आपल्या भावी पतीची आपल्याला आलेली खाजगी पत्रेही प्रेमापोटी भावी सासूला दाखविणारी निरागस शांता आहे ( रेडिओची गोष्ट ).

स्वतःला विसरून पाहत असता स्वतःला न विसरणारा पण गरिबांच्या सेवेला लागताच स्वतःलाच नव्हे तर आईच्या वचनालाही पूर्णपणे विसरणारा तो आहे ( स्वतःला विसर ), तर आपल्या बायकोवर सतत बाळंतपण लादून

तिची काळजी न घेता तिच्याकडे पूर्ण दुर्लक्ष करणारा दशरथ आहे ( आठव्या मुलाचा जन्म ).

मित्रत्वाच्या पवित्र नात्याने भाराकून आपली लाडकी बहीण ड्रायव्हर मित्राला देणारा उदार मित्र आहे ( लॅारी ), तसेच वाघाचा माग काढून त्याला मारण्यासाठी उन्हाची व काट्याकुट्याची पर्वा न करता भटकणारे बहाद्दर हाके आहेत ( हाका ).

माथेरानला जाण्याची इच्छा नसतानासुध्दा पोकळ सामाजिक प्रतिष्ठेच्या बायकोच्या हट्टासाठी नाखुषीने तयार झालेला नारायणराव आहे ( हवा खाण्याचे ठिकाण ), तर मग्रूर समाजाला न नमता त्याला अद्दल घडविणारा बहाद्दर हरभट्ट आहे ( प्रायश्चित ).

मोकाशींच्या कथेत आलेल्या या सर्व व्यक्ति आपली स्वत:ची अशी गुणवैशिष्टये घेऊन आलेल्या आहेत. त्या व्यक्तींच्या अनुषंगाने तत्कालीन समाजात वावरणाऱ्या विविध प्रवृत्तीच्या व्यक्तींचे स्वभाव, वागण्याच्या त्यांच्या तऱ्हा, कुटुंबातील त्यांचे स्थान , त्यांचा समाजावर होणारा परिणाम, तत्कालीन समाज जीवन, सामाजिक, आर्थिक , धार्मिक व कौटुंबिक परिस्थितीचा त्या व्यक्तीवर झालेला परिणाम या सर्वांचा आलेख पाहावयास मिळतो.

## संदर्भ


| | | | |
|---|---|---|---|
| १ प्रल्हाद वडेर | - लघुकथेतील व्यक्तिदर्शन आलोचना ऑक्टोबर १९७२ | - | पृ. ४२ |
| २ ना.सी.फडके | - प्रतिमासाधन - १९३१ | - | पृ. १०९ |
| ३ ,, | - ,, ,, | - | पृ. ११० |
| ४ गंगाधर गाडगीळ | - खडक आणि पाणी पॉप्युलर प्रकाशन, मुंबई- दुसरी आवृत्ती, १९६६ | - | पृ. २२५-२२६ |
| ५ डॉ.अ.ना.देशपांडे | - आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड - २. | | पृ. ५८२ |
| ६ राम मंत्री | - सामान्यांच्या असामान्य कथा महाराष्ट्र टाईम्स, रविवार, ३ जुलै, १९८८ . | - | पृ. ४ |